14/3/18

ई-टेंडरींग कक्ष
वक क्र:....२१९५....
दिनांक:..१४/०३/२०१८

स ५
३९१२
२५/४/१८

डि.२ डो.रि.११

ANNEXURE "A"
(See rule 3)

Format of Application for obtaining information under
**The Right to Information Act 2005**

[Court fee stamp: 10 रु. / Rs.10 / COURT FEE / भारत / INDIA / दस रुपये / TEN RUPEES]

To:
The Public Information Officer,
मिरा - भाईंदर मनपा
मुख्य कार्यालय.

1. FULL NAME OF APPLICANT: कृष्णा सी. गुप्ता (सत्यकाम फाउंडेशन)

2. ADDRESS & CONTACT NO: एस/१०६, पटाडिया कॉम्पलेक्स, उत्तन रोड, भाईंदर (प), जि. ठाणे 401101. मो. 8424823262

3. PARTICULARS OF INFORMATION REQUIRED:

(i) Subject matter of information: दिनांक: २२/०२/२०१८, रोजी च्या CCTV footage बाबत.

(ii) Period to which the information relates: दिनांक: २२/०२/१८, सकाळी - ११:30 ते २०:45 पर्यंत.

(iii) Description of information required:
१) कृपया मला दि: २२/०२/१८ सकाळी ११:30 वाजता पासून रात्री २०:45 वाजे पर्यंतची मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या, पहिल्या मजल्यावर सामान्य प्रशासन जवळ असलेल्या सी.सी.टी.व्ही (CCTV) कॅमराच्या फुटेज सी.डी मध्ये किंवा माझे पेंड्राइव मध्ये नि:शुल्क देण्यात यावे.
नोट: सी.डी (DVD) चे अधिकृत फी (चार्ज) मी भरायला तयार आहोत, त्यामुळे या अर्जासोबत सी.डी चे रु. ६० ची पावती जोडत आहोत.)

(iv) Whether information is required by post or in person: पोस्ट

(v) In case by post (Registered or Speed): रजिस्टर.

Place : भाईंदर (प)

Date : २६/०२/१८

Signature of the applicant २६/०२/१८

Scanned by CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

आपत्ती व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/आ.व्य.२९६/२०१७-१८
दि.
१४/०३/२०१८

प्रति,
श्री. कृष्णा सी. गुप्ता
एस/१०६, पटाडीया कॉम्पलेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती उपलब्ध करून देणेबाबत.**
**संदर्भ : १) आपला दि. २४/०२/२०१८ रोजीचा अर्ज. (प्राप्त दि. १४/०३/२०१८)**
**२) अपिल क्र. केआर-२००७/२०१५, दि. २२/०२/२०१६.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय माहिती अधिकार अर्जान्वये आपण दि. २२/०२/२०१८ रोजी सकाळी ११:३० वाजलेपासून ते रात्री २०:४५ पर्यंतचे मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयातील, पहिल्या मजल्यावरील सामान्य प्रशासन विभागाजवळ सी. सी. टी. व्ही. चे फुटेज उपलब्ध करून देणेबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयांमध्ये लावण्यात आलेले सी. सी. टी. व्ही. कॅमेरे हे मा. पोलिस विभागाने दिलेल्या निर्देशानुसार व महानगरपालिकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने लावण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्र. २ च्या मा. महिती अधिकार द्वितीय अपिल सुनावणी दरम्यान दिलेल्या निर्णयानुसार पोलिसांच्या सुचनेनुसार महानगरपालिकेमार्फत सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली असल्याने माहितीचा अधिकार अधिनियमातील २००५ अंतर्गत कलम 8(g) मधील तरतूदीनुसार वरील माहिती देण्याची आवश्यकता नाही. आपल्या माहिती अधिकार अर्जामध्ये माहिती उघड करण्यामागे विशिष्ट सार्वजनिक हित असल्याचे आपण नमुद केलेले नाही.

तरी आपला माहिती अधिकार अर्ज याद्वारे निकाली काढण्यात येत आहे. प्राप्त माहितीने आपले समाधान न झाल्यास मा. उप-आयुक्त (मु.), तिसरा मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय यांचे कडे ... न प्रथम अपिल अर्ज ...

भारतीय डाक
<<Track on www.indiapost.gov
India Post

SP BHAYANDER <401101>
GSTIN No: 27AAAG0114P1Z5
EM0409779806IN
Counter No:1,OP-Code:RVD
To:KRUSHNA C GUPTA,
BHAYANDER, PIN:401101
From:MIRA BHAYANDER , BHY W
Wt:10grams, ,15/03/2018 ,11:14
Amt:18.00
,CGST @9% 1.5 ,SGST @9%: 1.
<<Track on www.indiapost.gov
भारतीय डाक
India Post

(मनस्वी म्हात्रे)
जन माहिती अधिकारी
तथा सिस्टीम प्रोग्रामर
आपत्ती व्यवस्थापन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned by CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

जा.क्र.मिभामनपा/उपआ.आ.व्य./२५३/२०१८
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१,
दुरध्वनी क्र.२८१९२८२८, २८१९३०२८
दिनांक:१९/०३/२०१८

ई-टेंडरींग ...
आवक क्र.: 2220
दिनांक: 20/03/2018

सुनावणी दिनांक:-२३/०३/२०१८
वेळ:- दुपारी १२.३० वाजता

प्रति,
श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल प्रथम अपिल रोजीचा अपील अर्ज.

संदर्भ:- आपला दि.१७/०३/२०१८ रोजीचा अपील अर्ज.
(या कार्यालयाकडे प्राप्त दि.१९/०३/२०१८, आ.क्र.४६).

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये आपण केलेल्या संदर्भाधीन प्रथम अपिलाची सुनावणी, मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर खाली दिलेल्या नमुद दिवशी/वेळी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीचा दिनांक व वेळ :- दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३५ वाजता.
ठिकाण :- प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन),
यांचे दालन, तिसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.). ता.जि.ठाणे ४०११०१.

स्वीय सहाय्यक
Pgawade रनजीत गावडे

(मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) यांचे निर्देशानुसार)

मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- मा.जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (आपत्ती व्यवस्थापन),
मिरा भाईंदर महानगरपालिका, यांना सुनावणीचे दिवशी आवश्यक
त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणेकामी
(सोबत श्री.कृष्णा सी. गुप्ता यांच्या संदर्भिय अर्जाची छायांकित प्रत)

Scanned by CamScanner

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपितीय अधिकारी तथा उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०४६/२०१७-१८
दि.०६/०४/२०१८.

आवक क्र. ३५
दिनांक: ८/४/२०१८

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा)

## -: **विवेचन** :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांचेकडे दि.२६/०२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) कृपया मला दि.२२/०२/२०१८ सकाळी ११.३० वाजता पासून रात्री २०.४५ वाजेपर्यंतची मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पहिल्या मजल्यावर सामान्य प्रशासन जवळ असलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेराच्या फुटेज, सी.डी. मध्ये किंवा माझ्या पेन ड्राईव्ह मध्ये नि:शुल्क देण्यात यावे.
नोट:- सी.डी. (DVD) चे अधिकृत फी (चार्ज) मी भरायला तयार आहोत, त्यामुळे या अर्जासोबत सी.डी. चे रु.४०/- ची पावती जोडत आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१७/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.सी.सी.टीव्ही/२५३/२०१८ दि.१९/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२६/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती अधिकार अधिनियमातील २००५ अंतर्गत कलम ८ (जी) मधील तरतुदीनुसार माहिती देण्याची आवश्यकता नाही.

Scanned by CamScanner

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) अपिलार्थी अर्जदार यांनी सादर केलेल्या कैंद्र माहितीचा अधिकार, नवी दिल्ली फाईल क्र.CIC/VS/A/2013/000889SH, दि.२३/०५/२०१४ च्या निर्णयाचे व अपिल क्र.केआर-२००७/२०१५ दि.२२/०२/२०१६ च्या निर्णयाचे अवलोकन करणे बाबत विधी अधिकारी यांना लेखी पत्र देऊन अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (सी.सी.टीव्ही यंत्रणा)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सी.सी.टीव्ही यंत्रणा) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार

आपत्ती व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/आ.व्य./३३/२०१८-१९
दि. २८/०४/२०१८

प्रति,
श्री. कृष्णा सी. गुप्ता
एस/१०६, पटाडीया कॉम्पलेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती उपलब्ध करून देणेबाबत.**

**संदर्भ :** १) आपला दि. २४/०२/२०१८ रोजीचा अर्ज. (प्राप्त दि. १४/०३/२०१८)
२) अपिल क्र. केआर-२००७/२०१५, दि. २२/०२/२०१६.
३) जा.क्र. मनपा/आ.व्य./२१७/२०१७-१८, दि. १४/०३/२०१८
४) जा.क्र. माअधि/अपिल/०४६/२०१७-१८, दि. ०६/०४/२०१८
५) CIC/VS/A/2013/000889/SH, दि. २३/०५/२०१४

महोदय,

उपरोक्त संदर्भिय माहिती अधिकार अर्जान्वये आपण दि. २२/०२/२०१८ रोजी सकाळी ११:३० वाजलेपासून ते रात्री २०:४५ पर्यंतचे मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयातील, पहिल्या मजल्यावरील सामान्य प्रशासन विभागाजवळ सी. सी. टी. व्ही. चे फुटेज उपलब्ध करून देणेबाबत मागणी केलेली आहे. संदर्भ क्र. ३ अन्वये आपल्या अर्जामध्ये माहिती उघड करण्यामागे विशेष सार्वजनिक हित असल्याचे नमुद केलेले नसल्याने आपला अर्ज निकाली काढण्यात आलेला होता.

सदर बावत आपण मा. उप-आयुक्त (मु.) यांचे कडे सादर केलेल्या प्रथम अपिलीय अर्जामध्ये आपणास माहिती आवश्यक असल्याचे कारण नमुद करून अर्ज सादर केला. संदर्भ क्र. ५ अन्वये अर्जदार यांना त्यांच्याशी निगडीत माहिती उपलब्ध करून देणे बंधनकारक असले तरीही फुटेज साठवणीचा कालावधी २५ ते ३० दिवसांपुरता मर्यादित असल्याने आपला प्रथम अपिलीय अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याच्या दिनांकापर्यंत महानगरपालिकेच्या सिस्टीममध्ये उपलब्ध डेटा (फुटेज) Overwrite झालेले आहे.

त्यामुळे सदरची माहिती आपणास उपलब्ध करून देता येत नाही. आपल्या अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे आपण डी. व्ही. डी. करीता फी भरल्याची पावती या विभागाकडे जमा केल्यास आपल्यास सदरची रक्कम परतावा करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

०५/०५/१८

O/C

(मनस्वी म्हात्रे)
जन माहिती अधिकारी
तथा सिस्टीम प्रोग्रामर
आपत्ती व्यवस्थापन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

संपर्क क्रमांक : ८४३३९१११४४
ई-मेल : dm.mbmc@gmail.com

Scanned by CamScanner